
# तापमानात घट, थंडीत वाढ!

## 24 तासात 1.6 सेल्सीअसने घटले अमरावतीचे तापमान



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )**– आठवड्याभरानंतर ढगाळ वातावरण हटल्याने रविवारपासून कडाक्याची थंडी पडू लागली आहे. तापमानात घट झाली असून, बुधवारी उत्तरेकडून वाहत येणाऱ्या थंड वाऱ्याने विदर्भालाही गारठवून सोडले. तीन दिवसापासून तापमान घसरण्याचे सत्र सुरू असून बुधवारी त्यात मोठी घसरण झाली. अमरावतीमध्ये गेल्या 24 तासात 1.6 सेल्सीअस पर्यंत घट झाली असल्याचे दिसत आहे.

डिसेंबरचा पहिला संपूर्ण आठवडा ढगाळ वातावरणामुळे थंडीविनाच गेला. दुसऱ्या आठवड्यात मात्र थंडीने रंग दाखवायला सुरुवात केली आहे. पहिल्या तिनच दिवसात तापमान 8 ते 10 अंशाने खाली घसरले. किमान तापमानात अशाप्रकारे घसरण झाल्याने थंडीचा तडाखा बसला आहे. रात्री व पहाटेच्या वेळी प्रचंड हुडहुडी भरत असून घराबाहेर पडणे त्रासदायक ठरत आहे. सूर्यकिरणे जमिनीवर पोहचेपर्यंत बाहेर पडायला पाय धजावत नाही. दिवसाचे तापमानही सरासरीपेक्षा 1 ते 2 अंशाने कमी असल्याने दिवसासुद्धा गारव्याची जाणीव होत राहते. हवामान विभागाच्या अंदाजानुसार थंडीचा हा प्रकोप पुढचे 10 दिवस म्हणजे 20 डिसेंबरपर्यंत जाणवत राहणार आहे. या काळाता तापमान स्थिर किंवा आणखी घसरण्याची शक्यता आहे.

### विदर्भाच्या नंदनवनातही हुडहुडी



विदर्भाचे नंदनवन चिखलदरा येथे तापमान मोठ्या प्रमाणात कोसळले असून जवळपास 8 अंश सेल्सिअसपर्यंत तापमान पोहोचले आहे. त्यामुळे संपूर्ण परिसर पूर्णत: गारठल्याची अनूभूती येत आहे. आठवड्याभरानंतर थंडीने पुन्हा कमबॅक केले आहे. तापमान पाच ते सहा अंशांनी घटले आहे. फेंगल चक्रीवादळामुळे कडाक्याची थंडी पडत असताना अचानक थंडीमुळे गारठलेला परिसर सामान्य तापमानावर आला होता. शनिवार, रविवारपासून पुन्हा कडाक्याची थंडी पडू लागली आहे. दिवसरात्र गरम कपडे व शेकोटीजवळ बसून थंडीपासून मेळघाटातील आदिवासी बांधवांना स्वत:ची संरक्षण करावे लागत असल्याचे चित्र आहे. आठवड्याभरानंतर थंडीने पुन्हा कमबॅक केले आहे. तापमान पाच ते सहा अंशांनी घटले आहे. फेंगल चक्रीवादळामुळे कडाक्याची थंडी पडत असताना अचानक थंडीमुळे गारठलेला परिसर सामान्य तापमानावर आला होता. शनिवार, रविवारपासून पुन्हा कडाक्याची थंडी पडू लागली आहे. दिवसरात्र गरम कपडे व शेकोटीजवळ बसून थंडीपासून मेळघाटातील आदिवासी बांधवांना स्वत:ची संरक्षण करावे लागत असल्याचे चित्र आहे. चिखलदरा वेथील पर्यटनस्थळासह मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सेमाडोह, कोलकास येथील जंगल सफारी, हत्ती सफारीसाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या कडाक्याच्या थंडीत वाढली आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला भेट देणारे पर्यटक मुसळधार पावसात आणि थंडीत सारख्याच संख्येने येत असल्याचे चित्र आहे. त्याला कारणीभूत येथील शुद्ध, स्वच्छ पर्यावरण आहे.

# साईनगर येथील दोन फ्लॅटमधून दागीण्यांसह रोख लंपास

## चोरटे सीसीटीव्हीत कैद



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )** – साईनगर संकुलातील सालासर रेसिडेन्सीच्या दोन फ्लॅटमधून अज्ञात चोरट्यांनी लाखो रुपयांचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. याशिवाय तिसरा फ्लॅट फोडण्याचाही प्रयत्न झाला. चोरीची ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

माहितीनुसार, सालासर रेसिडेन्सी ही श्रद्धा कॉलनी, साईनगर येथे आहे. ही रेसिडेन्सी तीन विंगमध्ये आहे. शहरातील वंशिका शोरूममध्ये व्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेले राकेश महेंद्र लठिया (वय 48) हे सी-विंगच्या चौथ्या मजल्यावर फ्लॅट क्रमांक 402 मध्ये राहतात. त्याच फ्लॅटच्या अगदी समोर, फ्लॅट क्रमांक 404 मध्ये सुलोचना मुरलीधर लढवे (वय 64) राहतात आणि त्यांच्या शेजारी फ्लॅट क्रमांक 403 मध्ये विभागीय आयुक्त कार्यालयात काम करणारे अमितकुमार गिरी राहतात.

हे तिन्ही फ्लॅट आज सकाळी 10.30 वाजता बंद होते. यावेळी रेसिडेन्सीच्या मागून दोन तरुण घुसले आणि थेट चौथ्या मजल्यावर पोहोचले. या मजल्यावरील फ्लॅटचे कुलूप तोडून चोरट्यांनी राकेश लाठिया आणि सुलोचना लढवे यांच्या फ्लॅटमध्ये प्रवेश केला.

राकेश लाठिया यांच्या बेडरूममध्ये आणि मुलीच्या खोलीत प्रवेश करून कपाटाचे कुलूप त्यांनी तोडले आणि सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम दहा हजार लंपास केले. सुटकेसचे कुलूप न तुटल्याने सुटकेसमध्ये ठेवलेले 35 हजार रुपये वाचले.

तसेच अमितकुमार गिरी यांच्या फ्लॅटचे कुलूप तोडण्याचाही चोरट्यांनी प्रयत्न केला, मात्र कुलूप तोडणे शक्य नसल्याने चोरट्यांनी तेथून मागच्या रस्त्याने दुचाकीवरून पळ काढला. ही संपूर्ण घटना तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. बडनेरा पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासून पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# ट्रान्सफॉर्मर जळाला तर महावितरणला कळवा

## अमरावती परिमंडळाचे तत्पर सेवेसाठी प्रयत्न



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )**– रब्बी हंगामात शेतीला सुरळीत वीज पुरवठा देण्यासाठी महावितरण प्रयत्नशील आहे. परंतू काही कारणास्तव ट्रान्सफॉर्मर बिघडला असेल आणि महावितरणला ट्रान्सफॉर्मर बिघडल्याची खबर मिळाल्यानंतर कमाल तीन दिवसात ट्रान्सफॉर्मर बदलण्यात येत आहे. तथापि, ट्रान्सफॉर्मर जळाला आहे, हेच उशीराने समजले तर प्रत्यक्षात वीज पुरवठा पुन्हा सुरू होण्यास अधिक विलंब लागतो याची जाणीव ठेवून महावितरणने तत्पर सेवेसाठी एक पाऊल पुढे करत स्थानिक शेतकऱ्यांनी ट्रान्सफॉर्मर नादुरूस्त झाल्याची माहिती महावितरणला कळविण्याचे आवाहन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले आहे. त्यासाठी महावितरणकडून अमरावती जिल्ह्यातील ग्राहकांसाठी जिल्हा पातळीवर कार्यरत असलेल्या कंट्रोल रूमचा 7875763873 हा मोबाईल नंबर उपलब्ध करून देण्यात आला आहे.महावितरणने उपलब्ध करून देण्यात आलेल्या कंट्रोल रूमशी काही कारणास्तव संपर्क होत नसल्यास जिल्ह्यातील ग्राहकांनी कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांना 7875763018 या क्रमांकावर खबर देता येईल. त्यासोबत या व्हॉट्स अॅप नंबरवर जळालेल्या ट्रान्सफॉर्मरचा फोटो आणि ठिकाणाचा तपशील कळविता येईल. गावातील ट्रान्सफॉर्मर जळाला तर विद्युत पुरवठा खंडित होऊन गावकऱ्यांची गैरसोय होते. जळालेल्या ट्रान्सफॉर्मरच्या जागी दुरुस्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी महावितरणने सातत्याने प्रयत्न चालविले आहेत. त्यासाठी ट्रान्सफॉर्मर ऑईल तातडीने उपलब्ध करणे, दुरुस्त ट्रान्सफॉर्मरचा साठा तयार करणे असे विविध उपाय केले आहेत.

### तीन दिवसात होणार दुरुस्ती

ट्रान्सफॉर्मर बदलणे व दुरुस्त करणे याचा आढावा मुख्यालय स्तरावर दररोज घेण्यात येतो. या मोहिमेला यश आले असून महावितरणला ट्रान्सफॉर्मर बिघडल्याची माहिती मिळाल्यानंतर कमाल तीन दिवसात ट्रान्सफॉर्मर बदलण्यात येत आहे. तथापि, ट्रान्सफॉर्मर जळाला आहे, हेच उशीराने समजले तर प्रत्यक्षात वीज पुरवठा पुन्हा सुरू होण्यास अधिक विलंब लागत असल्याची समस्या जाणवत आहे. यावर मात करण्यासाठी वीज ग्राहकांनी महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# घरकुल योजनेतून डावलले

## दिव्यांग बांधवांचा जि.प.वर ठिय्या ■ जिल्हा परिषद सीईओंना दिले निवेदन




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )** – जिल्ह्यातील अचलपूर व मोर्शी तालुक्यातील दिव्यांग बांधवांना शासनाच्या घरकुल योजनेतून डावलण्यात आले आहे, असा आरोप करत अपंग जनता दलाच्या वतीने बुधवारी( दि.11) दुपारी जिल्हा परिषद मुख्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. तीव्र निदर्शने करीत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनापुढे ठिय्याही देण्यात आले. आंदोलनाची तीव्रता बघता यावेळी जिल्हा परिषद प्रशासनाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा घडवून आणली. अपंग जनता दलाच्या शिष्टमंडळाने सिईओंना निवेदन दिले.

केंद्र व राज्य शासनाकडून दिव्यांगांचा जलद गतीने विकास व्हावा म्हणून विविध योजना चालविल्या जातात. त्याचसोबत दिव्यांगांना प्रथम प्राधान्य दिल्या जाते. मात्र, अचलपूर तालुक्यातील वाघडोह येथील रहिवाशी व मोर्शी तालुक्यातील शिरजगांव येथील व्यक्तींना डावलले आणि स्थानिक ग्रामपंचायत व पंचायत समिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार करून पात्र नसनाऱ्या नागरिकांना घरकुलाचा लाभ दिल्याचा आरोप अपंग जनता दलाने निवेदनातून केला आहे. खऱ्या दिव्यांग बांधवांना डावलणार्या प्रशासनातील नाकर्ते कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच लाभापासून डावललेल्या दीव्यागांना घरकुलाचा लाभ देण्यात यावा. या मागणीला घेऊन संघटनेच्यावतीने जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनासमोर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात धनश्री पटोकार, कांचन कुकडे, प्रमोद शेबे, शेख रुस्तम, जहिर खान, मो. इलियाज, मो. राजिक, फारुक शाह, मंगेश ढगे, महेश ढगे, नासिर बेग, राजेश पटोकार राहुल वानखडे व अनवर शाह आदींचा सहभाग होता.



### कर्ज बाजारी मजुराची तलावात उडी घेऊन आत्महत्या

**तळेगाव दशासर** – कर्ज बाजारी मजुराने तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना तळेगाव दशासर येथून जवळच असलेल्या उसलगव्हाण येथे उघडकीस आली. दिवाकर शंभरकर असे मृताचे नाव आहे. दिवाकर यांनी मॅक्रो फायनान्स कंपनीकडून बेसिकचे कर्ज घेतले होते. त्या कर्जाच्या वसुलीसाठी फायनान्स कंपनीकडून नेहमी तगादा लावला जात होता. त्यामुळे पैसे भरण्याच्या मानसिक तणावात ते होते. या तणावातून दिवाकर यांनी आत्महत्या केली असावी, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# धावत्या बसमध्ये वृद्धेला हृदयविकाराचा झटका

## अमरावतीहूल साऊरकडे जाताना घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 11 )** – राज्य परिवहन महामंडळ अमरावतीहून आपल्या गावी जाण्यासाठी निघालेल्या एका 72 वर्षीय महिलेला हृदयविकाराचा झटका आल्याने तिचा धावत्या बसमध्ये मृत्यू झाला. ही घटना बुधवारी( दि.11) ला सकाळी 11 वाजताच्या सुमारास घडली.

पुष्पा रमेश सोनोने (वय 72, रा.साऊर) या नावाने त्या वृध्द महिलेची ओळख पटली. पुष्पा सोनोने या आपल्या मुलीकडे आल्या होत्या. परत आपल्या गावी जात असताना त्या शेगाव नाका येथून अमरावती ते परतवाडा बसमध्ये बसल्या. परंतू नवसारी जवळ कंडक्टर तिकीट काढत असताना या महिलेला हृदयविकाराच्या तीव्र झटका आला, आणि ती जागीच गतप्राण झाली. त्यामुळे बसमध्ये मोठा गोंधळ उडाला. यावेळी बस वाहकाने तत्काळ पोलिसांना डायल 112 वरून माहिती देऊन एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवले. त्यानंतर गाडगे नगर पोलिसांनी घटनास्थळ गाठून महिलेचा मृतदेह बसमधून खाली उतरवून रुग्णवाहिकेद्वारे इर्विन रुग्णालयाच्या शवागारात पाठवला.

# राष्ट्रीय शालेय कबड्डी स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )** – विभागीय क्रीडा संकुलात आयोजित 68व्या राष्ट्रीय शालेय कबड्डी स्पर्धेचे मंगळवार, दि. 10 डिसेंबर रोजी थाटात उद्घाटन करण्यात आले. 68 वी राष्ट्रीय शालेय कबड्डी 14 वर्ष मुले, मुली वयोगट क्रीडा स्पर्धा सन 2024-25 चे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या उपस्थित करण्यात आले. सिव्हील न्यायधीश वरिष्ठस्तर राजेंद्र गोगले, राज्य परिवहन अधिकारी कांचन जाधव, विदर्भ ?म्युचअर कबड्डी संघटनेचे सचिव जितूभाऊ ठाकुर, एसजीएफआय पर्यवेक्षक तृप्ती अग्रवाल, नविन खंडूजा, स्पोर्ट्स डायरेक्टर तथा सिनेट सदस्य सुभाष गावंडे, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी नितीन चव्हाळ, एसजीएफआय सदस्य सुरेद्र शर्मा, उपस्थित होते. महापात्र यांनी, खेळाडुंनी खेळ भावनेने खेळाचा आनंद घेऊन खेळ प्रवृत्तीस प्रोत्साहन द्यावे. सकारात्मक विचार करून व जीवनामध्ये यशस्वी शिखर गाठावे असे मार्गदर्शन केले. नरेंद्र गाडे यांच्या मार्गदर्शनात मल्लखांब खेळाचे प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. क्रीडा उपसंचालक विजय संतान यांनी प्रास्ताविक केले. सेवानिवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी प्रदिप शेटीये यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा क्रीडा अधिकारी लता गुप्ता यांनी आभार मानले.

# जळगावच्या व्यापाऱ्याशी वाद करून लुटले

## बडनेरा रेल्वे स्थानकाजवळ बुधवारी पहाटेची घटना






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )** – बडनेरा रेल्वे स्थानकाजवळ काही नागरिकांनी जळगाव येथील एका व्यावसायिकाशी वाद केला. त्यानंतर व्यापाऱ्याची सोन्याची चेन व अंगठी चोरी गेल्याचे निदर्शनास आले. या घटनेची तक्रार व्यापाऱ्याने बडनेरा पोलिस ठाण्यात दिली आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी आठ ते दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

जळगाव येथील व्यापारी राहुल लड्ढा हे कुटुंबीयांच्या लग्न समारंभासाठी अमरावती येथे आले होते. सिकची रेस्टॉरंटमध्ये हा विवाहसोहळा पार पडला. दरम्यान ते एमएच 28/ बीडब्ल्यू 0351 या क्रमांकाच्या कारने आपल्या ओळखीच्या लोकांना घेण्यासाठी बडनेरा रेल्वे स्थानकावर सोडण्यासाठी आले. बडनेरा रेल्वे स्थानकाच्या जवळ असताना आठ ते दहा अज्ञातांनी त्यांची गाडी अडवून वाद घातला. वाद इतका वाढला की हाणामारी सुरू झाली. या वादात राहुल लड्ढा यांची सोन साखळी व अंगठी खाली पडली. दरम्यान यातील काही दागिने घेऊन ते नागरिक पळून गेले होते. बुधवारी सकाळी घडलेल्या या घटनेने कॅम्पसमध्ये खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची माहिती बडनेरा पोलिसांना मिळताच त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणीसा सुरुवात केली. व्यापारी राहुल लड्ढा यांच्या फिर्यादीवरून आठ ते दहा अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अमरावतीत वास्तव्यास असलेल्या बांगलादेशींवर कारवाई करा!

## शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांची मागणी ■ पोलिस आयुक्तांना निवेदन सादर



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.11 )** – बांग्लादेशातील हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर भारतात बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या बांग्लादेशी नागरिकांचा मुद्दा पुढे आला असून पोलीस प्रशासनाने अमरावती शहरातील विविध भागात कथितरित्या वास्तव्यास असलेल्या बांग्लादेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करावी आणि त्यांची देशातून हकालपट्टी करावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून करण्यात आली. या मागणी संदर्भात शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांचे नेतृत्वात पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांना निवेदन दिले.

अमरावती शहरातील विविध भागात काही बांगलादेशी नागरिक आपली ओळख लपवून व बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीरपणे वास्तव्यास असल्याची माहिती असून ते बांग्लादेशी विविध उद्योग व एमआयडीसी मधील फॅक्टरीमध्ये कार्यरत असल्याचे समजते. अमरावती शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टिकोनातून आणि कुठलीही अप्रिय घटना होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनाने मोहीम राबवित शहरात बेकायदा वास्तव्यास असलेल्या बांग्लादेशी नागरिकांचा शोध घ्यावा आणि त्यांच्यावर कडक कारवाई करीत त्यांची देशातून हकालपट्टी करावी, अशी मागणी याप्रसंगी सुनील खराटे यांनी केली. यावेळी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सविस्तर चौकशी करून शहरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांग्लादेशी नागरिकांचा शोध घेऊन कारवाई करण्यात येईल अशी ग्वाही शिवसेनेच्या शिष्टमंडळास दिली. निवेदन देताना जिल्हाप्रमुख सुनील खराटे शिवसेना (उ.बा.ठा.) यांच्या नेतृत्वात , शिवसेना उपनेते सुधीर सूर्यवंशी तथा संपर्क प्रमुख, प्रतिभा बोपशेट्टी, मनीषा टेंबरे, राजश्री जठाळे, शहर प्रमुख जयश्री कुऱ्हेकर, पंजाबराव तायडे, विजय मंडले, सुमित राऊत, रवी अंबळकर यांच्यासह अन्य शिवसैनिक उपस्थित होते.

### शिवसेना स्टाईलने निपटणार

बांग्लादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराचा आम्ही निषेध करीत असून केंद्र सरकारने या संदर्भात कडक भूमिका घ्यावी, अशी आमची मागणी आहे. येत्या आठ दिवसात पोलीस प्रशासनाने अमरावती शहरातील बांग्लादेशी नागरिकांना हुडकून न काढल्यास आम्ही शिवसेना स्टाईलने बेकायदा राहणाऱ्या बांग्लादेशींना शोधून त्यांचा समाचार घेऊ असा इशारा सुनील खराटे यांनी याप्रसंगी दिला.

### मुस्लिम समाज बांधवांना आवाहन

अमरावती शहरात राहणाऱ्या मुस्लिम समाज बांधवांनी बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांची माहिती पोलिसांना किंवा आम्हाला द्यावी जेणेकरून तुम्हाला त्रास होणार नाही असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजुला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# तर इर्विन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत लोटांगण!

## पूरग्रस्तांच्या समस्यांना घेऊन प्रहारचा आंदोलनाचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 ) -** वलगाव, रेवसा, सातुर्णा, हातुर्णा, कुंड, सर्जापुर येथील पूरग्रस्त व पुनर्वसनाच्या नागरी सुविधांची समस्या मोठ्या प्रमाणात समोर आली आहे. समस्यांच्या निराकरणासाठी बुधवारी (दि.11) प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देण्यात आली. यावेळी पूरग्रस्तांच्या मागण्या तत्काळ पूर्ण न झाल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (इर्विन) येथून तर जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत लोटांगण घालत आंदोलन करण्यात येईल. तसेच वेळ पडल्यास राहुटी आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी प्रहार जिल्हाध्यक्ष छोटू महाराज वसू यांनी निवेदनातून दिला आहे.



सन 2007 मध्ये वलगांव या ठिकाणी नदीला महापूर आला होता. त्यामुळे नदीकाठी असलेल्या गावातील नागरिकांच्या घरामध्ये पाणी घुसले. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शासनाने अश्या पुरग्रस्त नागरीकांचे पुनर्वसन करण्यासाठी भुखंड दिले. त्या भूखंडावर आजवर कोणत्याही प्रकारची नागरी सुविधा केलेली नाही. त्याचप्रकारे पुरग्रस्त, पुनर्वसीतांच्या भुखंड बांधकामासाठी कोणत्याही प्रकारचा बांधकाम निधीही मिळाला नाही. त्यामुळे वलगांव येथील पूरग्रस्त, पुनर्वसन लाभार्थ्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्याचे प्रहार जनशक्ती पक्षाचे म्हणणे आहे. तसेच रेवसा येथील पुरग्रस्त पुनर्वसीतांना भुखंड मिळाला असून काही नागरिकांनी घर बांधकाम केले, तर काहींना अजूनही बांधकाम करता येत नाही. बांधकाम निधीचा फक्त प्रथम हफ्ता चाळीस हजार रुपये मिळाला आहे.

मिळालेली रक्कम त्या भुखंडावर पडीत झाड झुडपे असल्यामुळे ते तोडून साफसफाई करण्यात खर्च झालेली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी घरासाठी पायासुद्धा बांधू शकले नाहीत. बांधकाम करण्यासाठी 2007 प्रमाणे दोन्ही गावांना निधी मंजुर केला असून त्या निधीतून घर बांधणी होत नसल्याचे प्रहारचे म्हणणे आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारची नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे तत्काळ पुरग्रस्तांच्या समस्या निकाली काढण्यात याव्या, अन्यथा 16 डिसेंबरपासून लोटांगण आंदोलन तसेच जिल्हाधिकारी कार्यालय येथे लहानापासून तर ज्येष्ठांपर्यंत राहुटी आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाने निवेदनातून दिला आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष छोटू महाराज वसू, महानगर प्रमुख बंटी रामटेके, अभिजित गोंडाणे, अजय तायडे, कुणाल खंडारे यांच्यासह अन्य पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

# आमदार प्रताप अडसडांना पालकमंत्री पद दया!

## तालुका भाजपची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.11 ) -** धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघातून आमदार प्रताप अडसड 16 हजार 200 मताधिक्याने विजय झाले. आ.प्रताप अडसड यांना सलग दुसऱ्यांदा लोकांनी आमदार बनविले आहे. प्रामाणिक नेतृत्व, संवेदनशील आचरण, अध्यात्मिक विचारांची वागणूक, सभ्यतेचे आचरण, उच्च विचारांची देवाण-घेवाण व पक्षाशी प्रमाणिक असणारे आ.प्रताप अडसड यांना अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री बनविण्याची मागणी नांदगाव खंडेश्वर तालुका भाजपने केली आहे.

अडसड कुटूंब पुर्वीसाठी भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी बांधील आहे. यापुर्वी



विदर्भ वैज्ञानिक विकास मंडळाचे माजी अध्यक्ष, संघाचे कार्यकर्ते माजी आमदार अरुण अडसड यांचा सगळ्या कार्यकर्त्यांसमोर आदर्श आहे. धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघात तिनही तालुक्यात सारखा विकासाचा ध्यास प्रताप अडसडांना आहे. कोट्यवधी रुपयांच्या निधीतून त्यांनी मतदारसंघाचा चेहरा, मोहरा बदलून टाकला आहे. त्यामुळे जनतेने त्यांना पुन्हा एकदा आमदार बनविले. त्यांनी अनेक देवस्थानांना 'ब' वर्ग तिर्थक्षेत्र विकास निधी आणला, कामाचा प्रथम टप्पा चालू आहे, हा एक मोठा आनंद मतदारसंघांत झाला. शांत, संयमी, आमदार प्रताप अडसड अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री पदाचे खरे दावेदार आहेत. यात तिळभर शंका नाही. सर्व जाती, धर्माच्या लोकांना न्याय देणारे नेतृत्व असल्याने प्रताप अडसड हे मंत्री व्हावे अशी मागणी माजी जि.प.सदस्य रवींद्र मुंदे, भाजपचे नांदगाव खंडेश्वर तालुकाअध्यक्ष अध्यक्ष निकेत ठाकरे, प्रा.उध्दव पारवे, भाजप अनुसूचित जाति मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सुरेश वैश्य, नितीन गायधनी, रुपभ कस्तुरे, अमोल गुल्हाने, दिपक लिखिते, वसंतराव सावत, भाऊराव भारसके, गणेश माटोडे, अमोल इंगोले, निखिल मोरे, दिलीप गायधनी, प्रवीण इंगोले, प्रविण जिरापुरे, प्रविण वाघमारे, यांच्यासह धामणगांव रेल्वे विधानसभा क्षेत्रातील संपूर्ण भाजपा कार्यकर्त्यांनी केली आहे.

# गांधी महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन




**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि. 11 )-** नजिकच्या बडनेरा येथे गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात 06 डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे पर्यवेक्षक दिलीप इखार, प्रमुख पाहुणे म्हणून मिलिंद चिरडे, सुनंदा उके व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पनाने झाली. त्यानंतर शालेय विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यासोबतच प्रशांत दुधे यांनी गीता द्वारे आपली श्रद्धांजली अर्पण केली. प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या सुनंदा उके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप इखार यांनी सुद्धा आपले अध्यक्षीय भाषणामध्ये महामानवास त्रिवार अभिवादन करून आपणही या कार्यक्रमातून प्रेरणा घ्यावी असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनुजा पोलखडे व आभार नियती यादगिरे यांनी केले.

# 'कमला' नाटकाचे सादरीकरण


## झेनिथ कन्सेप्ट स्कूलचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.11 )-** तळणी येथील झेनिथ कन्सेप्ट स्कूल तर्फे आयोजित आणि अभिरुची कला व क्रीडा मंदिराद्वारे सादर केलेल्या विजय तेंडुलकर लिखित व डॉ. शाम देशमुख दिग्दर्शित दोन अंकी सामाजिक नाटक 'कमला' या नाटकाला पालक आणि प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

स्त्रीजीवनाचे हृदयस्पर्शी आणि प्रभावी चित्रण करणाऱ्या या नाटकाने समाजातील ज्वलंत प्रश्नांना प्रकाशात आणले. प्रेक्षकांना अंतर्मुख करणारे हे नाटक कलात्मकता आणि संवेदनशीलतेने भरलेले होते. नाटकाचे मुख्य कलाकार व तांत्रिक टीम मध्ये मुख्य भूमिका- एडवोकेट सतीश उपाध्याय यांनी सादर केली तर इतर कलाकारांमध्ये रेणू पुराणिक, सिद्धी काळे, कुंदा वंजारी, एडव्होकेट प्रदीप प्रेमलवार, डॉ. मनोज उज्जैनकर यांचा समावेश होता. सेट डिझाईन ची जबाबदारी प्रो. डॉ. सावन देशमुख यांनी तर लाईट ची जबाबदारी चंद्रकांत कराळे यांनी पार पाडली. संगीत स्वप्नील घोडेस्वार यांनी दिले. प्रा. माणिक देशमुख हे प्रमुख मार्गदर्शक होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. भोजराज चौधरी, प्राचार्य डॉ. रजनीश बांबोळे, प्रा. सुदामा हांडे, प्रा. गुलवाडे, प्रा. साकेत चिंचमलातपूरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्कूलच्या डायरेक्टर डॉ. दिपाली देशमुख, मुख्याध्यापक दिनेश फंदे आणि संपुर्ण शिक्षक वर्गाचे बहुमूल्य योगदान लाभले. या नाटकाने प्रेक्षकांच्या मनावर अमीट छाप पाडली आणि सामाजिक संदेश दिला.



## अंबादासपंत मोहोड यांचे निधन

**अमरावती -** अंबादासपंत कृष्णराव मोहोड रा.माधान ह.मु. महाविर नगर, अमरावती यांचे सोमवार (दि.10 डिसेंबर) रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते 80 वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी प्रमिला, मुलगा महेंद्र , सुना, भाऊ व नातवंडे असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर सोमवारी येथील हिंदू स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध कार्यक्रम



**महासागर प्रतिनिधी,**

**मोर्शी, ( दि.11 )-** तालुक्यातील ग्राम अंबाडा येथील ग्रामविकास विद्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली वाहण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर विविध भाषणे देऊन सांगितले की रक्ताचा एक थेंब न सांडविता बाबासाहेब आंबेडकर यांनी 1956 साली नागपूर येथे धम्मक्रांती घडवून आणली. बाबासाहेबांनी देशात हजारो वर्ष गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या समाजाला गुलामीतून मुक्त केले. त्यांच्या अंधारलेल्या वस्त्यांमध्ये ज्ञानाचा सूर्य बाबासाहेबांनी पेराला. म्हणून दरवर्षी आपल्या मुक्तिदात्याला महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात येते. तसेच शिक्षक नांदने यांनी विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल भरपूर माहिती दिली. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अविनाश साळकर तसेच पर्यवेक्षक अविनाश फुटाणे व परीक्षा प्रमुख प्रशांत लोखंडे उपस्थित होते. विद्यालयाचे शिक्षक श्रीकांत केंडे यांनी प्रास्ताविक केले.

## आज डाक अदालतीचे आयोजन

**अमरावती-** भारतीय डाक विभागामार्फत गुरूवार, (दि.12 डिसेंबर) रोजी डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. ही डाक अदालत प्रवर अधीक्षक, डाकघर अमरावती विभाग यांच्या कार्यालयामध्ये दुपारी 4 वाजता होणार आहे. पोस्टाच्या कामासंबंधी विशेषतः स्पीड पोस्ट, काउंटर सेवा, डाक वस्तू रजिस्टर पार्सल, बचत बँक व मनीऑर्डर अशा तस्सम तक्रारीबाबतचे निराकरण सहा आठवड्याच्या आत झाले नसेल व त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नसेल, अशा तक्रारी विचारात घेऊन डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

# गिरीजन विद्यालयात बाबासाहेबांना आदरांजली





## महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.11 ) -** चिखलदरा येथील गिरीजन विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली देण्यात आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिवसानिमित्त आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दानदात्यांकडून शाळेच्या वाचनालयाला भारतीय राज्यघटनेच्या प्रती दान करण्यात आल्या.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते तसेच ज्येष्ठ पत्रकार मोहम्मद अश्रफ, प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते पंजाबराव नाईक, नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष मनोज शर्मा, शाळेचे मुख्याध्यापक मोहन चव्हाण, पत्रकार नारायण येवले, शिक्षण विस्तार अधिकारी अलका बोंडे, कृष्णकला चुनडे, विषय तज्ञ श्रीकृष्ण लुटे, आनंदराव वानखडे इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी आनंदराव वानखडे यांच्या वतीने शाळेच्या वाचनालयाला भारतीय राज्यघटनेच्या 25 प्रती देण्यात आल्या. त्यामुळे आदिवासी मुलांना आता राज्यघटना वाचायला मिळणार आहे, हे विशेष. शासनाचे वतीने संविधानाचं वाचन व्हावं अशा प्रकारच्या सूचना आहेत आणि आता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी गिरीजन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चिखलदरा या ठिकाणी होणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता शाळेतील शिक्षक अजय सोळंके, सुनील चव्हाण, श्रीकांत वानखडे, गणेश दांडगे, तुषार चरोडे, हेमंत बक्षी यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी तायडे तर आभार गणेश दांडगे यांनी केले. या कार्यक्रमाकरिता शिक्षकेतर कर्मचारी संजय अवघड, नंदकिशोर मरुडकर व किरण वर्मा या सर्वांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रमाची जबाबदारी अतिशय चांगल्या प्रकारे यशस्वीरित्या पार पाडली.

# मेथी, डिंक, सुकामेव्याच्या लाडवांना पसंती

## थंडी पळवणारे पौष्टिक लाडू

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.11 ) -** हिवाळा आरोग्यदायी ऋतू असल्यामुळे 'तब्येतीत' राहण्यासाठी आणि आणखी तब्येत कमविण्यासाठी घरोघरी पौष्टिक लाडू बनवले जात आहेत. यासाठी गृहिणींची सुकामेव्याच्या दुकानांवर गर्दी दिसून येत आहे. तयार लाडूही 600 रुपये किलोपासून उपलब्ध आहेत.

हिवाळ्यात पौष्टिक अन्न खाल्ल्यास ते 'अंगी' लागते, असे मानतात. त्यामुळे घरोघरी लाडू बनविण्याचे वेध लागतात. लाडवांसाठी सुकामेवा, मेथी, डिंक, उडीद आदींचा वापर केला जातो. सकाळी अनशापोटी मेथीचा लाडू खाल्ल्याने शक्ती वाढते, असे जुनी जाणती माणसे म्हणतात. त्यामुळे घरोघरी विद्यार्थी, तरुणांना या लाडूंचा आग्रहाने खुराक दिला जाताना दिसून येत आहे.





लाडू बनविण्याच्या तयारीला घरोघरी वेग येण्यास सुरुवात झाली आहे. थंडीत शक्तीदायक ठरणारे लाडू तयार करण्यासाठी सुकामेव्याला मागणी वाढली आहे. त्यामुळे सुकामेव्याचे दरही काहीसे वधारले आहे. सरासरी 15 ते 20 टक्क्यांनी दर वाढ झाल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही जीवनमान धकाधकीचे बनले आहे. त्यामुळे इच्छा असूनही अनेकांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. ही कसर भरुन काढण्यासाठी शक्य होईल तशी आरोग्याची काळजी घेतली जाते.

त्यामुळे थंडीची चाहूल लागताच डिंक आणि मेथीचे लाडू तयार करण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये काजू, गहू, बदाम, खारीक, खोबरे, मेथी, डिंक, अक्रोड, पिस्ता, वेलची, तुप अशा शरीराला उर्जा देणाऱ्या विविध पदार्थांचा वापर करून लाडू तयार करण्याला प्राधान्य दिले जात आहे.

यंदा थंडी उशिराने सुरु झालेली आहे. मात्र, मागील काही दिवसांमध्ये पारा जलद गतीने खाली चालला आहे. त्यामुळे थंडीपासून शरीराचे संरक्षण व्हावे आणि उब मिळावी यासाठी डिंकाचे लाडू तयार केले जात आहेत. त्यामुळे सुकामेव्याच्या दरात काहीशी वाढ झाली असली तरीदेखील थंडीचा कडाका वाढताच खरेदीची लगबग वाढली आहे. दरम्यान, रोज नवीन आजारांची भर घातली जात आहे. कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती असलेल्यांना लवकर आजार होतो. त्यामुळे केवळ थंडीच्या दिवसाची वाट न पाहता वर्षभर सुकामेव्याचे विविध पदार्थ तयार करण्याकडे कल वाढीला लागला आहे. मात्र मागील 10 ते 15 दिवसांपासून मागणी वाढल्याने सुकामेवा महागला आहे.

### आरोग्यदायक लाडू

जिल्ह्यात शेतीचे प्रमाण अधिक असल्याने वातावरणात वर्षभर गारवा जाणवतो. तर थंडीच्या दिवसात गारव्याचे प्रमाण अधिक पटीने वाढते. त्यामुळे थंडीपासून बचाव करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला जातो. मेथी आणि डिंकाचे लाडू आरोग्य सुदृढ राहण्यासाठी उपयोगी ठरतात. त्यामुळे सुकामेवा खरेदी करण्यासाठी नागरिकांची दुकानांवर गर्दी होत आहे. दिवाळीनंतर घट झालेल्या सुकामेव्याच्या मागणीत आता 20 ते 25 टक्क्यांची वाढ झाल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. ही थंडीची सुरुवात आहे. त्यामुळे म्हणावी तशी मागणीत वाढ झालेली नाही. जसजशी थंडी वाढत जाईल तसतशी सुकामेव्याच्या मागणीतही वाढ होत जाणार आहे. पुढील काळात दर स्थिर राहण्याची शक्यता आहे असे सुखामेवा दुकानदार सांगतात.


## जाहीर नोटीस

**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील ( श्री. एस.एम. जाधव ) दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

**आर.एम.जे.सी.क्र. ६१४/२०२४** **ने.ता. २२/०१/२०२५**

अब्दुल नईम अब्दुल अजीज वय ५३ वर्षे धंदा- मजुरी
रा. काझीपुरा अंजनगांव सुर्जी ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती..... अर्जदार
निरंक .... गैरअर्जदार

याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येत की, अर्जदाराचे पती नामे अब्दुल अजीज शेख वजीर यांचा दिनांक ०९/११/२०१४ रोजी मृत्यू झाला आहे. नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | साजेदा बानो अब्दुल अजीज | वय ७८ वर्षे | पत्नी |
| २ | अब्दुल कदीर अब्दुल अजीज | वर्ष ५७ वर्षे | मुलगा |
| ३ | अब्दुल नईम अब्दुल अजीज | वय ५३ वर्षे | मुलगा |
| ४ | अब्दुल हकीम अब्दुल अजीज | वय ४८ वर्षे | मुलगा |
| ५ | अब्दुल मतीन अब्दुल अजीज | वय ४७ वर्षे | मुलगा |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

अब्दुल अजीज शेख वजीर हे मरण पावलयामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदाराला वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणली करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/१२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर अंजनगांव सुर्जी जि. अमरावती**

## जाहीर नोटीस

**अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील ( कु. स्नेहा रा. जाधव ) सह. दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

**आर.एम.जे.सी.क्र. ६१५/२०२४** **ने.ता. ०९/०१/२०२५**

अफजल बी मोहम्मद एहसान वय ३६ वर्षे धंदा- घरकाम
रा. विहीगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती..... अर्जदार
निरंक .... गैरअर्जदार

याअर्थी या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस कळविण्यात येत की, अर्जदाराचे पती नामे मोहम्मद एसान मोहम्मद इसराईलोद्दीन यांचा दिनांक ०५/१०/२०२० रोजी मृत्यू झाला आहे. नमूद केल्याप्रमाणे यांचे वारस खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | अफजल बी मोहम्मद एहसान | वय ३६ वर्षे | पत्नी |
| २ | मोहम्मद अदनान मोहम्मद एहसान | वर्ष २१ वर्षे | मुलगा |
| ३ | मोहम्मद नोमान मोहम्मद एहसान | वय १६ वर्षे | मुलगा |
| ४ | मोहम्मद उजेर मोहम्मद एहसान | वय १२ वर्षे | मुलगा |

या व्यतिरिक्त ईतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

मोहम्मद एसान मोहम्मद इसराईलोद्दीन हे मरण पावलयामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामाकरीता तसेच इतर कामाकरीता वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदाराला वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यमान सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंजनगांव सुर्जी येथे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (१८२७) चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असून या अर्जावर कुणालाही आक्षेप घेणे असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिद्धी तारखेपासून एक महिण्याचे आत आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा या अर्जावर कुणाचाही आक्षेप, हरकत नाही असे गृहित धरून अर्जावर सुनावणली करून अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र दिल्या जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/११/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर अंजनगांव सुर्जी जि. अमरावती**